गौण वन उपज मूल्यवर्धन आदिवासी समूहाला सशक्त करणारे साधन

Archana Bhatt and Vipindas

गौण वन उपज चे मूल्यवर्धन हा एक अत्यंत उत्तम उपाय आहे. यामुळे वन उत्पादनाचे अतिशय चांगल्या पद्धतीने मूल्य मिळते आणि त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारू शकते. अतिशय तळागाळात काम करणाऱ्या चांगल्या संस्थांच्या सोबत सरकारच्या मदतीने हे काम केल्यास आदिवासी आणि उपेक्षित समूहाला अतिशय उत्तम असे उपजीविकेचे साधन मिळू शकते.



जंगली गुसबेरीच्या पृथक्करणात गुंतलेला समुदाय

वायनाड हा आदिवासी बहुल असा प्रांत आहे या जिल्ह्यात बारा आदिवासी समुदाय विविध बोली भाषा, सांस्कृतिक विविधता, उपजीविकेच्या पारंपरिक पद्धती आणि सामाजिक आर्थिक विविध स्तर यांचे दर्शन होते. आदिवासींची अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अशी आर्थिक घडण ही वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेली आहे ज्यामध्ये जंगलांवर अवलंबित असे श्वन- उत्पादनश आणि त्यावर आधारित आर्थिक घडण हे प्रामुख्याने दिसून येते. अभ्यासांती असे दिसून आलेले आहे की वन उत्पादनांवर अवलंबित अशा समुदायाला बऱ्याच गोष्टींना तोंड द्यावे लागते जसे की अतिशय विपरीत हवामान, त्यात सातत्याने होणारे बदल जंगल उत्पादनापर्यंत पोहोचण्यासाठी टाकण्यात आलेल्या अटी, आणि त्यामुळे मर्यादित प्रमाणात मिळणारा हा रानमेवा, त्याला मिळणारे अतिशय कमी असे बाजार मूल्य आणि आरोग्याशी संबंधित अनेक गोष्टी ज्या जंगलात जाऊन हा रानमेवा गोळा करताना अनुभवावा लागतो. या सगळ्या गोष्टींमध्ये जंगलांवर अवलंबित असणाऱ्या समुदायाला अतिशय कमी उत्पन्न मिळते.

विविध गौम वनउपज गोळा करणे हे शारीरिक रित्या अतिशय कष्टिक असून त्याला योग्य प्रमाणात जर प्रोसेस केले नाही तर अतिशय कमी असे उत्पन्न मिळते. जरी हे गोळा करण्यासाठी त्यांनी आपली अतोनान कष्ट केले असले तरीदेखील या उत्पादनाला बाजारात कमी मूल्य मिळते याचे कारण मोजमापात होणाऱ्या चुका, दलालाना द्यावे लागणारे कमिशन, काही उत्पादन लवकर खराब होतात. कधी कधी हंगामाच्या काळात खूप मोठ्या प्रमाणात उत्पादन येणे, त्याची साठवणूक करण्यासाठी सोयी सुविधा नसणे आवश्यक ते अधिकचे भांडवल नसणे, आणि त्यामुळे चांगले पॅकेजिंग करता न आल्यामुळे बाजारमूल्य कमी होणे अशा अनेक बाबींमुळे चांगले वन उत्पादन असून देखील बाजार मूल्य कमी मिळते. याशिवाय काही गोष्टी नाशिवंत असल्यामुळे आदिवासींना अतिशय कमी दरात त्यांचे वन उत्पादन विकावे लागते. परिनामी या आदिवासी समाजाची गरिबी वाढतचं जाते.

योग्य पुढाकार

केरळमध्ये वायनाड जिल्ह्यात पुथाडी ग्रामपंचायती मध्ये चीयाम्बम ७३ ही वसाहत आहे. ही वसाहत सरकारी मालकीची होती आणि इथे वृक्षारोपण करण्यासाठी जागा होती, जी जमीन नंतर ३०२ आदिवासी कुटुंबीयांना त्यांच्याजवळ जमीन नव्हती अशांमध्ये विभागण्यात आली. जमीन प्रामुख्याने पणियान , कट्टूनायकं मुलुकृमा या आदिवासी समुदायांमध्ये प्रामुख्याने विभागण्यात आली. हे समुदाय प्रामुख्याने गौण वन उपज गोळा करण्यामध्ये सहभागी होते. जंगलाच्या सानिध्यात राहिल्या असल्यामुळे यातील काही समुदाय हे पारंपरिक रित्या वन उत्पादनावर अवलंबून नसले तरी देखील त्यांना आता यावर अवलंबून राहावे लागत होते. ३०२ कुटुंबीयांपैकी ५३ कुटुंबीय हे वन उत्पादनावर मोठ्या प्रमाणात उपजीविकेसाठी अवलंबित होते वन उत्पादनाच्या महिन्यांमध्ये त्यांचे महिन्याचे उत्पादन हे ९०: पेक्षा जास्त आहे असे दिसून आले. म्हणजेच वन उत्पादनावर हे समुदाय अतिशय मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत हे लक्षात आले आणि त्यामुळेच या उत्पादनाचे मूल्यवर्धन करणे हे अत्यंत आवश्यक आहे जेणेकरून यांचे उत्पन्न निश्चितपणे वाढू शकते असे अभ्यासांती लक्षात आले.

कम्युनिटी ऍग्रो बायोडायव्हर्सिटी सेंटर, एम एस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन वायनाड केरळ यांनी पुढाकार घेऊन गौण वन उपज च्या मूल्यवर्धनासाठी प्रयत्न केले. याचा मूळ उद्देश हा फक्त होणारे नुकसान भरून काढणे एवढेच नव्हते तर बाजारात योग्य प्रमाणात माल पोहोचत नसल्यामुळे आणि दलालाने व्यवस्थित मूल्य न दिल्यामुळे होणारे नुकसान भरून काढणे तसेच उत्पादनाचे शेल्फ

लाइफ वाढवणे म्हणजेच योग्य प्रमाणात साठवणूक करता येणे आणि त्याला योग्य पद्धतीने उत्तम दर्जाचे पॅकेजिंग करून बाजारात पोचवणे यासाठी देखील मूल्यवर्धन करणे आवश्यक आहे आणि ज्यामुळे एकूण उपजीविकेच्या संधी वाढून उत्पन्न वाढेल हे बघणे यावर देखील भर ठेवण्यात आला. नुसतेच मोठ्या प्रमाणात वन उत्पादन गोळा करणे हा उद्देश न ठेवता असलेल्या वन उत्पादनाचे चांगले मूल्य मिळायला पाहिजे हा उद्देश देखील ठेवण्यात आला. नाबार्डच्या मदतीने आणि भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या मदतीने हे काम करायला सुरुवात केली. यासाठी २०१८ पासून मोठ्या संख्येने फिल्ड स्टडीज आणि योग्य प्रमाणातील ट्रेनिंग देणे, तसेच याच वेळी वन उत्पादन गोळा करणे आणि त्यामध्ये येणारे प्रश्न नेमके शोधून काढणे आणि त्या दृष्टीने मग कालांतराने मूल्यवर्धन करणे अशी सगळी प्रक्रिया सुरू झाली. प्रशिक्षणाचा कार्यक्रम वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये विभागण्यात आला सगळ्यात पहिले वन उत्पादना बद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली त्यानंतर प्रत्यक्ष कौशल्य वर आधारित असे प्रशिक्षण प्रात्यक्षिकांच्याद्वारे देण्यात येऊन उत्पादन काढणे आणि ते बाजारात येणे अशा टप्प्यांमध्ये हे प्रशिक्षण देण्यात आले. एस एच जी वन मल्लिका असा सहा महिला आणि चार पुरुष यांचा एक बचतगट तयार केला. आदिवासी गटांना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. मूल्यवर्धनाच्या वेगवेगळ्या विषयांवरती या गटांना प्रशिक्षण देण्यात आले जसे की उत्पादनामध्ये जास्तीत जास्त न्यूट्रिएंट्स कसे राहतील तसेच कोणत्याही प्रकारचे प्रिझर्वेटिव्ह किंवा भेसळ न वापरणे, तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांना योग्य पद्धतीने हाताळणे आणि मूल्यवर्धन हे विशिष्ट सीजनमध्ये योग्य गतीने होण्यासाठी काय काय करावे लागते आणि ते उपलब्ध करून देणे आणि नाशिवंत अशा वन उत्पादनाना कशा पद्धतीने हाताळावे असे सर्व प्रशिक्षण देण्यात आले. मूल्यवर्धन हे दोन्ही गोष्टींवरती लक्ष केंद्रित होईल असे करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले आणि ते म्हणजे घरगुती पोषक अशी पदार्थांची निर्मिती करणे आणि ती सुरक्षित राहील याची काळजी घेणे तसेच त्यातून उत्तम असे उत्पन्न देखील निर्माण होईल. पण प्रक्रिया करणे व मूल्यवर्धन यावर भर दिला गेला.

अन्न प्रक्रिया करण्यासाठी आणि मूल्यवर्धन करण्यासाठी सुरुवातीला या संस्थेकडे अतिशय कमी असे बजेट होते. वन उत्पादनांचे मूल्यवर्धन हा काही उत्पन्नाचा मूळ स्त्रोत नसून हा साह्य कसा स्त्रोत असणार होता आणि त्यामुळेच हा सहाय्यक स्रोत सातत्याने उपलब्ध व्हावा यासाठीच त्यामुळे प्रयत्न करण्यात आले सध्या हे युनिट पपई, आले, कॉफी,फणस अशा उत्पादनांच्या मूल्यवर्धनावर लक्ष केंद्रित करत असून योग्य सीजनच्या वेळी याकडे लक्ष देण्यात येते. मूल्यवर्धित केलेले उत्पादन आणि त्यांची झालेली बाजारातील विक्री याचा तक्ता क्रमांक एक मध्ये देण्यात आलेला आहे.

प्रशिक्षकांनी प्रशिक्षणाच्या सोबतच विक्रीसाठी देखील मदत केली तसेच शेतकरी उत्पादक संघटना ज्या आधीपासूनच या मूल्यवर्धनाच्या कामात मोठ्या प्रमाणामध्ये सहभागी होत्या त्यांच्या नेटवर्कचा उपयोग करून येथील आदिवासींना मदत करण्यात आली

तक्ता क्रमांक १.

क्र.	गौण वन उपज	मूल्यवर्धित केलेले उत्पादन
१	आवळा	लोणचे, मधा सोबत आवळा आवळा कॅन्डा वाळवलेला आवळा आवळ्याची पावडर औषधी गुणवत्तेसाठी आवळ्याचे बी
२	मध	प्रक्रिया केलेले मध (उष्णता देणे, गाळणे, उकळने)
३	फणस	पायसम, वट्टी, बिर्याणा, फ्रीटर्स समोसा आणि बियांची पावडर
४	आलं/अद्रक	वाळवलेले आले, आले पावडर, आले कॉफी, आले पावडर, सुखे अद्रक
५	याम	याम मिक्सचर
६	कढीपत्ता	कढीपत्त्याची पावडर कडीपत्ता आणि चिंचेची एक पावडर
७	मोरिंगा	मोरिंगा पावडर (पानाची)

सध्या ही संस्था दोन महत्त्वाचे मार्केटिंग संबंधीचे धोरण राबवते आहे ते म्हणजे उत्पादनांची थेट बाजारात विक्री करणे, आणि दुसरी म्हणजे या जैविक प्रोडक्टसाठी संपूर्ण राज्यात छोटे छोटे अस्तीत्वात असलेले इको शॉप्स यांचा विक्रीसाठी उपयोग करणे. सध्या ही सुरुवातच असल्यामुळे काही वर्षात हा प्रकल्प अधिक यशस्वी होईल याची संस्थेला खात्री आहे.

परिणाम

सध्या हा प्रकल्प ही सुरुवात नवीन असल्यामुळे आत्ताच एकूण कुटुंबीयांवर या उत्पादनाचा नेमका काय परिणाम झालेला आहे हे सांगणे तसे थोडेसे अवघडच आहे. परंतु आतापर्यंत उपलब्ध असलेल्या अभ्यासावरून एक साधारण अंदाज असा बांधता येतो की आरारूट ची पावडर जी आहे ती कोणत्याही प्रकारची भेसळ नसलेली अगदी शुद्ध अशी पावडर असल्यामुळे ही बाजारात कमीच उपलब्ध असते आणि त्यामुळे याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे परंतु यात सगळ्यात मोठा चॅलेंज हे यावर प्रक्रिया करणे हा भाग आहे. जंगली आरारोट बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे परंतु कच्च्या मालाला बाजारात कमी भाव मिळत असल्यामुळे आदिवासी समुदाय यांना गोळा करण्यामध्ये फारसा उत्सुक नाही आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात ही पावडर निर्माण करणे तसे अवघडच होते. परंतु आता मोठ्या प्रमाणात मशिनरी उपलब्ध झाली आहे आणि त्यामुळे कच्चामाल गोळा होऊ शकतो आणि त्यावर प्रक्रिया करून मोठ्या किमतीमध्ये बाजारात विकल्या जाऊ शकते. मागील वर्षी २० किलो पंधराशे रुपये प्रति किलो अशा मूल्यात विकले गेले मागील वर्षी एकूण एक लाखापर्यंत उत्पन्न मिळाले.

मूल्यवर्धनामुळे आदिवासी महिलांना आर्थिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणात मदत झाली तसेच सामाजिक आणि आर्थिक रित्या त्या एकत्रित आल्या आणि त्यामुळे बऱ्याच प्रमाणात त्यांच्यात बदल घडले जे की



पौष्टीक समृद्ध अन्न महोत्सव

अतिशय चांगले होते. सुरुवातीला वन उत्पादनाला विक्री करण्यासाठी आणि त्यांचे मूल्यवर्धन करण्यासाठी घेण्यात आलेल्या पुढाकारामुळे आणि त्यांना कच्च्या मालाला तसेच मूल्यवर्धित केलेल्या उत्पादनाला चांगली विक्री मिळावी यासाठी केलेली मदत त्यासाठी दिले जाणारे प्रशिक्षण यामुळे गटांना खूप चांगला आत्मविश्वास मिळाला त्यांना यामुळे जाणीव झाली की आपल्याला उपजीविकेचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत आणि संपूर्ण समुदाय हा अधिक चांगल्या पद्धतीने उपजीविकेचे इतर मार्ग निवडून सातत्याने चांगले उत्पन्न मिळवू शकतो तसेच कौशल्य विकसित झाल्यामुळे आणि वेगवेगळ्या प्रकारच्या घक्टिव्हिटीज मुळे मिळालेल्या ज्ञानामुळे त्यांच्यात अतिशय सकारात्मक असा बदल झाला आणि ते सशक्त झाले. कौशल्याधिष्टित असा कामगार यामुळे तयार झाला. तसेच तंत्रज्ञानाचे देखील त्यांना ज्ञान मिळाले.

कोविड काळात मोठ्या प्रमाणात आदिवासी विभागात कामगारांची कमी भासू लागली होती अशा विपरीत काळात व वन मल्लिके सारख्या संस्थांनी या गटातील समुदायाला आणि सदस्यांना चांगले प्रशिक्षण दिले आणि सहाशे रुपये प्रति व्यक्ती ते मिळू शकतील असे मूल्यवर्धनाचे आणि विपणनाचे धडे दिले. संस्थेने दिलेल्या न्यूट्री रीच या प्रकल्पातून मूल्यवर्धनाचे गिरवलेले धडे आणि वेगवेगळ्या संस्थांच्या मार्फत मूल्यवर्धनातून तयार झालेल्या पदार्थांना योग्य प्रदर्शनात मार्फत मोठ्या प्रमाणात ग्राहक मिळवून दिले त्यामुळे ग्राहकांनी या संस्थेच्या मार्फत निर्माण केलेले विविध उत्पादने ही चांगली असतात, घरगुती असतात, निसर्गाच्या जवळचे असतात आणि जैविक असतात याची खात्री पटल्यामुळे मोठ्या प्रमाणात ते घेतले देखील.

आव्हाणे आणि भविष्याचा वेध

सध्या कोविडमुळे मोठ्या प्रमाणात मूल्यवर्धनाच्या प्रक्रियेत बाधा येते आहे. फारशी मागणी नाही आणि त्यामुळे थोडे बहुत नुकसान देखील होते. संस्थेच्या मार्फत मोठ्या प्रमाणात घेण्यात येणारे जे मूल्यवर्धित उत्पादन आहे ते वाईल्ड आरारूट, आवळे मध, आंबा फणस असे ए का विशिष्ट मोसमात येणारे मौसमी उत्पादन आहे. या सगळ्यांना मूल्यवर्धित उत्पादनात रूपांतरित करण्यासाठी याची साठवणूक अत्यंत उत्तम रीतीने होण्यासाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक आणि खर्चिक अशा सोयी लागतात तसेच याचे मूल्यवर्धन हे तेव्हाच नफ्या मध्ये येते जेव्हा की कच्चामाल हा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो आणि अतिशय तत्परतेने आपल्याला तो गोळा करता येतो. या सगळ्या अडचणींमुळे मूल्यवर्धन करण्याला काही प्रमाणात अडथळा येतो. अशा बऱ्याच गोष्टी आहेत जसे की साठवणुकीच्या सोयी कमी असणे कधी कधी पॅकेजिंग देखील चांगल्या प्रमाणात आणि उत्तम रीतीने होत नाही आणि त्यामुळे शेल्फ लाइफ कमी होते तसेच विक्रीची धोरणे कधी कधी योग्यरित्या घेतले जात नाही जाहिरात देखील माफक प्रमाणात होते आणि त्यामुळे बाजार मूल्य कमी मिळते. तसेच कोविडच्या परिस्थितीमुळे सप्लाय चेन योग्य न मिळणे हा देखील एक महत्त्वाचा अडथळा निर्माण झाला आहे

दुसरी एक अडचण म्हणजे आदिवासी मंडळी त्याना योग्य प्रशिक्षनसल्यामुळे अघोरी पणाने सर्व कच्चा माल तोडतात व त्यामुळे कधीकधी या उत्पादनांची कमतरता देखील निर्माण होते. आदिवासी समुदाय हा मुळातच उपेक्षित असल्यामुळे इथे व्यावसायिक रित्या कोणतेही प्रशिक्षण घेणे हे काहीसे अवघड होऊन बसते. या गोष्टींमुळे उत्पादनाच्या निर्मितीपासून ते वाटपापर्यंत सगळ्याच ठिकाणी अडचण निर्माण होते. इथे एक गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे जी लक्षात घेतली पाहिजे की बाहेरून काम करणाऱ्या संस्थांनी आणि समाजातील सर्व स्तरातील गटांनी मोठ्या प्रमाणात आदिवासींना मदत केल्यास हा समुदाय सशक्त होऊ शकेल तळागाळात काम करणाऱ्या संस्थांनी सरकारच्या मदतीने जर हे काम हाती घेतले तर उपेक्षित अशा आदिवासी समुदायाला उपजीविकेच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत आणि होऊदेखील शकतात.

पोषणयुक्त मुल्यवर्धीत उत्पादनांचे वेगवेगळ्या स्तरावर प्रात्याक्षिके केल्यामुळे ग्राहकांमध्ये त्याबद्दल बऱ्यापैकी जाणिव निर्माण झाली

साभार

या लेखाचे लेखक मान्यवर बुशरा, बिंदू जोसेफ, नौशिक, पद्मिनी शिवदास या सगळ्यांना श्रेय देतात आणि आभार मानतात. या सर्वांची या कामासाठी मोठी मदत होते आहे.

Archana Bhaat
Scientist, Community Agrobiodiversity Centre
MSSRF, Wayanad, Kerala
Email : _archanabhatt 1991@gmail.com

Vipindas
Development Associate, Community Agrobiodiversity Centre, MSSRF, Wayanad, Kerala

मराठी अनुवाद : श्री. दत्ता पाटील

Source :Value addition of MFPs Potential tool to empower tribal community, Leisa India - June 2021